महाराष्ट्र शासन

पोलीस अधिक्षक कार्यालय, बुलढाणा

ई-मेल क्र. sp.buldhana@mahapolice.gov.in

दिनांक 06 -01-2026



विशेष पोलीस वार्तापत्र

पोलीस स्टेशन जानेफळ हद्दीतील अपहरण करून खुन करणा—या टोळीचा मुख्य सुत्रधार आरोपी अमोल राजपूत यास छात्रपती संभाजी नगर येथुन स्थानिक गुन्हे शाखा बुलढाणा पथकाने केले जेरबंद

पोलीस स्टेशन	अपराध क्र आणि कलम	फिर्यादी नाव व पत्ता
जानेफळ	अप क्र २०४/२०२४ कलम ३०२,१२०(ब),३६४,३६५ भांदवी	सौ.ज्योती दिलीप इंगळे वय.35 वर्ष रा.इंदिरा नगर जानेफळ जि.बुलढाणा
घटना ता.वेळ	**दाखल ता.वेळ**	**अटक आरोपीचे नाव व पत्ता**
दि.22/06/2024 चे 22/00 वा. दरम्यान	दि.09/07/2024 चे 22/29 वा	**अमोल जयसिंग राजपूत वय.38 वर्ष रा.इंदिरा नगर वार्ड न 04 जानेफळ ता.मेहकर जि.बुलढाणा**

गुन्हयाची थोडक्यात हकिकत

थोडक्यात हकीकत अशी आहे की, यातील फिर्यादीचे पती मृतक दिलीप इंगळे वय.45 रा.जानेफळ यांना यातील मुख्य आरोपी अमोल राजपूत व त्याचे इतर साथीदार यांनी आपसी संगनमंत करून नमुद घटना ता.वेळी व ठिकाणावरून अपहरण करून अहमदनगर येथे घेवुन गेले अशा फिर्यादीचे रिपोर्टवरून गुन्हा दाखल आहे. नमुद गुन्हयाचे तपासात यातील आरोपीतांनी आपसी संगनमत करून मृतक याला जिवानाशी ठार केल्याचे निष्पन्न झाले. त्यांनतर नमुद गुन्हयात आतापर्यंत 06 आरोपीतांना अटक करण्यात आले आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक श्री निलेश तांबे यांनी बुलढाणा जिल्हा पोलीस अधीक्षक पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर जिल्हयातील गंभीर स्वरूपाचे गुन्हयातील फरार असलेल्या आरोपींचा शोध घेणेबाबत पोलीस निरीक्षक श्री सुनिल अंबुलकर, स्था.गु.शा यांना विशेष सुचना देवुन पोलीस पथके तयार करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने पोलीस स्टेशन जानेफळ हद्दीतील मागील दिड वर्षापासुन फरार असलेला खुनाच्या गुन्हयातील मुख्य सुत्रधार आरोपी नामे अमोल जयसिंग राजपूत रा.जानेफळ हा गुन्हा केल्यापासुन फरार होता. तो सतत वेशभुषा बदलुन स्वतःची ओळख लपवुन छत्तीसगड, चंदीगढ, कर्नाटक, दिल्ली अशा वेगवेगळया राज्यात वास्तव्यास होता. नमुद आरोपीचा कसुन शोध घेण्याकरीता जिल्हा पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा बुलढाणा चे पोलीस निरीक्षक यांनी स्थानिक गुन्हे शाखा येथील अधिकारी व अंमलदाराचे पथक तसेच टेक्नीकल ॲनालेसीस विंगचे पथक तयार केले.

मुख्य सुत्रधार आरोपी अमोल जयसिंग राजपूत हा चंदीगढ येथुन छत्रपती संभाजी नगर येथे 27/12/2025 रोजी येथे आल्याबाबत तांत्रीक पध्दतीने माहीती प्राप्त करून त्याचा दि. 28/12/2025 पासुन सतत पाठलाग करीत असताना तों पळुन जाण्याचे बेतात असतांना तांत्रीक मदतीने व बुध्दीकौशल्याचा वापर करून अथक परीश्रमाने मोठया शिताफिने त्यास दिनांक 06/01/2026 रोजी हॉटेल राधीका इन, पॅराडाईज चौक छत्रपती संभाजी नगर येथुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक मा.श्री निलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक खामगाव श्री. श्रेणीक लोढा, अप्पर पोलीस अधीक्षक बुलढाणा, श्री.अमोल गायकवाड यांचे आदेशाने स्थानिक गुन्हे शाखा प्रमुख पोलीस निरीक्षक श्री. सुनिल अंबुलकर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा बुलढाणा पथकाचे पोउपनि अविनाश जायभाये, पोहेकॉ दिपक लेकुरवाळे, चांद शेख, गणेश पाटील,गजानन गोरले, मपोकॉ आशा मोरे, चापोकॉ निवुत्ती पूंड व टेक्नीकल ॲनालेसीस विंगचे पोहेकॉ राजु आडवे,ऋषीकेश खंडेराव, कैलास ठोंबरे ,पवन मखमले यांनी केली आहे.

करीता सदरची माहीती वुत्तपत्रात प्रसिध्द हाणेस विंनती आहे

सर्व पत्रकार बांधव यांना सस्नेह अग्रेषीत,

पोलीस अधीक्षक बुलढाणा

करीता